नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ७७ Issue - 77 | वार रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५३ Blow- Sunday Date 3 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# माजी पंतप्रधानांचा नातू प्रज्वल रेवण्णाला जन्मठेप

## विशेष कोर्टाचा महत्त्वपूर्ण निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरू : कर्नाटकच्या बंगळुरू येथील जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी खासदार आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्ज्वल रेवण्णा यांना न्यायालयाने (र्उींीं) जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. फार्म हाऊसमध्ये काम करणाऱ्या महिले-वरील बलात्कारप्रकरणी प्रज्वल रेवण्णावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गेल्या वर्षभरापासून याप्रकरणी न्यायालयीन खटला सुरू होता, अखेर आज बंगळुरू येथील विशेष न्यायालयाने प्रज्ज्वल रेवण्णा यास दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. त्यामुळे, जनता दल सेक्युलर पक्षाला (गऊ्ग) हा मोठा झटका मानला जा-तो. दरम्यान, लोकसभा निवडणुकांपूर्वीच प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील आर-ोपांमुळे राजकीय वर्तुळात रान उठले होते. त्यानंतर, देशभरात हे प्रकरण चर्चे त असल्याने आजच्या न्यायालयाच्या निर्णयाकडे देशाचे लक्ष लागले होते.

बंगळुरुमधील विशेष न्यायालयाने काल (शुक्रवारी ता. १) जनता दल (सेक्युलर) चे माजी खासदार आणि म ाजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवण्णा याला चार लैंगिक शोषण व बलात्कार प्रकरणांपैकी एका प्रकरणात दोषी ठरवले. विशेष न्यायाधीश संतोष गजानन भट यांनी आज रेवण्णाला जन्म ठेपेची शिक्षा सुनावली. रेवण्णाने त्याच्या कुटुंबाच्या फार्महाउसमध्ये काम करणाऱ्या एका ४७ वर्षीय महिलेने मागील वर्षी एप्रिलमध्ये त्याच्याविरोधात एफआयआर दाखल केली होता. तिने रेवण्णा यांच्यावर २०२१ पासून अनेकवेळा बलात्कार केल्याचा आणि या घटनेबद्दल कोणालाही सांगितल्यास व्हिडिओ लीक करण्याची धमकी दिल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आता रेवण्णावर बलात्कार, धमकी देणे आणि अश्लील फोटो लीक करणे अशा कलमांखाली आरोप करण्यात आले होते. गेल्या वर्षी सेक्स स्कॅण्डलमध्ये समोर आल्यानंतर रेवण्णाचे नाव चर्चेत आलं होतं. रेवण्णावर ५० हून अधिक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

दरम्यान, जेव्हा रेवण्णाच्या फार्म हाऊसमधील मोलकरणीने तक्रार दाखल केली, तेव्हा प्रज्वलविरुद्ध पहिला गुन्हा २८ एप्रिल २०२४ रोजी नोंदवण्यात आला. तक्रारदार महिला ही कुटुंबाच्या फार्महाउसमध्ये काम करणारी ४७ वर्षीय माजी मोलकरणी होती. तिने सांगितले की प्रज्वलने तिच्यावर एकदा नाही तर दोनदा बलात्कार केला.

प्रज्वल रेवण्णा माजी पंतप्रधान देवेगौडांचे नातू आहेत तर त्यांचे वडील कुमारस्वामी सध्या केंद्रात अवजड उद्योग मंत्री आहेत. हे प्रकरण २४ एप्रिल २०२४ रोजी हासनच्या स्टेडियमवर शेकडो पेन ड्राइव्ह सापडल्याने समोर आले. या पेन ड्राइव्हमध्ये प्रज्वल रेवण्णांचे दोन हजार आठशे सत्तर व्हिडीओ क्लिप्स आणि फोटो होते. व्हिडीओत अनेक म हिलांसोबतचे शरीरसंबंध दिसून येत होते. त्यानंतर, याप्रकरणी पन्नास महिलांच्या तक्रारी आल्या असून, बारा महिलांनी बलात्काराचा आरोप केला आहे. व्हिडीओ समोर येताच रेवण्णा भारताबाहेर निघून गेला होता. ३१ मे रोजी जर्मनीतून भारतात येताच त्याला अटक करण्यात आली. खटल्यात सव्वीस साक्षीदार, शंभर ऐंशी कागदपत्रे आणि अडतीस सुनावण्या झाल्या आहेत. प्रज्वलला दहा वर्षांपर्यंतची



कैद ते जन्मठेपेपर्यंतची शिक्षा वर्तवण्यात येत होती. अखेर, काल दोषी ठरल्यानंतर प्रज्वल रेवण्णा न्यायालयात रडला होता, आज त्याला विशेष न्यायालयाने जन्म ठेपेची शिक्षा सुनावली.

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा पुरावा म्हणजे घटनेच्या वेळी पीडितेने घातलेली साडी ही ठरली आहे. तप-ासात त्या साडीवर शुक्राणूंचे (स्पर्मचे) डाग आढळून आले आहेत. जे फॉरेन्सिक तपासणीमध्ये रेवण्णाचे असल्याचं समोर आलं आहे. मोलकरणीची ती साडी मोठा पुरावा म्हणून न्यायालयात सादर करण्यात आली होती. हा सर्वात मोठा पुरावा मानला गेला. त्याचबरोबर बलात्काराचे व्हिडिओ देखील कोर्टात सादर करण्यात आले होते. पीडितेने केवळ साडी जपून ठेवली नाही. तर तिने या घटनेचा व्हिडिओ देखील रेकॉर्डही केला होता.

# यवत हिंसाचार ; १७ आरोपींची पोलीस कोठडीत रवानगी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : यवतमध्ये शुक्रवारी दुपारी झालेल्या तणावानंतर पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. शुक्रवारी रात्री आणि शनिवारी दिवसभर तणाव निर्माण करणाऱ्या १७ जणांना बेड्या ठोकण्यात आल्या आ-हेत. या सर्वांना दौंड न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दौंडम धील यवत गावात राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी (एसअ-ारपीएफ) तैनात करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. तर १७ जणांना अटक करण्यात आली आहे. तोडफोड प्रकरणातील संशयित आरोपींची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत ३० जणांची ओळख पटविण्यात आली आहे, असे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी सांगितले.

शुक्रवारी सकाळी एका तरुणाने मध्यप्रदेश इथे एका ६० वर्षाच्या महाराजाने दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार केला, असं एका चॅनेलवर आलेल्या बातमीचं स्टेटस ठेवलं होतं. हे निमित्त साधून ही संपूर्ण शहरात दंगलसदृश स्थिती निर्माण झाल्याचे सांगितलं जात आहे. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्यानंतर यवत गावात तणाव निर्माण झाला. आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या तरुणाला पोलिसंनी शुक्रवारी ताब्यात घेऊन त्याला अटक केली. तरुणाला शनिवारी दौंड येथील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपी तरुणाला पाच ऑगस्ट पर्यंत पो-लीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. तर दुसरीकडे यवतमध्ये तणाव वाढण्यास चार दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची विटंबना केल्याचा प्रकारही कारणीभूत ठरला. यावरुन यवतसह दौंड तालुक्यात बंदचं आवाहन करण्यात आलं होतं. शिवरायांच्या प्रतिमेची विटंबना करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी तात्काळ अटक केली. पण यवतमध्ये तणावपूर्ण शांतता आहे.

# राज्य शासन एसटी महामंडळ आणि एसटी कामगारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : एसटी महामंडळ आणि एसटी कामगारांचे मूलभूत प्रश्न मार्गी लागले पाहिजेत अशी राज्य शासना-ची भूमिका असून राज्य शासन एसटी कामगारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे महासचिव हनुमंत ताटे यांचा अमृतमहोत्सव सोहळा व त्यानिमित्त आयोजित काम गार परिषदेत ते बोलत होते. हडपसर येथील विठ्ठल तुपे नाट्यगृहात आयोजित या कार्यक्रमास उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार चेतन तुपे, बापूसाहेब पठारे, ज्येष्ठ कामगार नेते बाबा आढाव, माजी आमदार रवींद्र धंगेकर, सुनील टिंगरे, म्हाडाचे माजी उपाध्यक्ष विजय कोलते, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, महाराष्ट्र एसटी काम गार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणा-ले, कोरोना कालावधीत एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न होता. तेव्हा राज्य शासनाने पुढाकार घेऊन वेतनाची आवश्यक ती तरतूद केली होती. राज्य शासन एसटी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या अडचणीच्या काळात मागे उभे रा-हते. सन १९४८ पासून एसटीचा प्रवास सुरू झाला असून 'गाव तेथे एसटी' या ब्रीदवाक्यानुसार सर्वसामान्य माणसाला प्रवासाची सेवा देत आहे. सेवा देत असताना एसटी लोकाभिमुख झाली पाहिजे. प्रवाशांनाही परवडणाऱ्या दरात सेवा देणे आवश्यक असून त्याबाबत काम गारांनीही पुढाकार घेतला पाहिजे. राज्यातील शहरांचा विस्तार झाल्याम ुळे एसटीच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जागा शहराच्या मध्यवर्ती भागात आल्या आहेत. त्या ठिकाणी एसटी स्थानकांचा सार्वजनिक खा-सगी भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) विकास करण्यासाठी कराराचा कालावधी ३०-३०-३० वर्षे असा वाढविण्याचे धोरण अंमलात आहे.

# महाराष्ट्राला नख लावणाऱ्यांना अंगावर घेऊ; राज ठाकरेंचा राज्य सरकारला इशारा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल: महाराष्ट्रातील मुलांना हिंदी कशी येईल, याचा विचार आम चे मुख्यमंत्री करतात, परंतु बाहेरून महाराष्ट्रात येणाऱ्यांना मराठी यावी यासाठी मात्र ते प्रयत्न करीत नाहीत', असा टोला मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी शनिवारी लगावला.

पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त शेकापने पनवेलमधील कार्यक्रमाला महाविकास आघाडीच्या नेत्यांसह मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनाही निमंत्रित केले होते. या कार्यक्रमास शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आदी उपस्थित हो-ते. आपल्या भाषणात ठाकरे यांनी पंतप्रधानांसह मुख्यमंत्र्यांवरही टीका केली. भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी शेकापचे कौतुक केले. शिवसेनेच्या पहिल्या अधिवेशनाची त्यांनी आठवण करून दिली. 'भगव्या व्यासपीठावर प्रथमच कॉम्रेड श्रीपाद डांगे यांच्या रूपाने लाल ध्वज फडकत होता. आज लाल ध्वजासह दोन भगवे ध्वज उप-स्थित आहेत. त्यावेळचे राजकारण आणि राजकारणी मोठ्या मनाचे होते. आता तसे राहिले नाही', अशी टिप्पणी राज यांनी केली.

'देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री गुजराती आहेत. महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प गुजरातला नेण्यात आले. गृहमंत्री एका मुलाखतीत सांगतात, मी हिंदी भाषिक नाही, मी गुजराती आहे. मात्र, आम्ही भाषेविषयी, राज्याविषयी बोललो तर संकुचित ठरतो. गुजरातम ध्ये हिंदी भाषेची सक्ती नाही. मग महाराष्ट्रातच हिंदी कशासाठी', असा सवाल त्यांनी केला. 'महाराष्ट्रात गुजराती साहित्य संमेलन भरविले जाणार आहे. खुशाल भरवा. यावर शिवसेना व मनसे काहीतरी बोलतील, असे त्यांना वाटत होते. परंतु लक्षात ठेवा, तुम्हाला जे वाटते ते आम्ही मुळीच बोलणार नाही. पण आम्हाला जे वाटते तेच आम्ही बोलू. गुजरातचे नागरिक नसलेल्या नागरिकांना शेतजमीन घेता येत नाही. रिझर्व्ह बँकेची विशेष परवानगी घ्यावी लागते', याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

'नव्या कायद्याप्रमाणे एखाद्या प्रकल्पाविरोधात बोलल्यास शहरी नक्षली ठरवणार असाल, तर अटक करूनच दाखवा', असे आव्हानही ठाकरे यांनी दिले. 'मराठी माणसाच्या थडग्यावर उद्योग उभे राहणार नाहीत. मराठी माणसाचा मानसन्मान राखून उद्योग आणावे लागतील. छत्रपतींच्या राजधानीत डान्सबार सुरू आहेत, यापेक्षा शरमेची गोष्ट काय? बंद झा-लेले डान्सबार सुरू कसे', असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. 'गुजरातमध्ये २० हजार बिहारींना हाकलून देणारे अल्पेश ठाकूर भाजपात प्रवेश करतात व त्यांचा सत्कार केला जातो आणि राज ठाकरेला देशद्रोही म्हटले जाते. स्वत:च्या राज्याची काळजी घेणारे हे लोक दुसऱ्या राज्यात मात्र गोंधळ घालायला येत आहेत', अशी मल्लिना-थीही राज यांनी केली.

**विद्यार्थ्यांनी डॉ.आंबेडकरांच्या विचाराचा अंगीकार करत ध्येय गाठावे -सरन्यायाधिश न्यायमूर्ती भूषण गवई**

**डॉ.आंबेडकर महाविद्यालयाचा हिरक महोत्सवी सोहळा उत्साहात संपन्न**

# समाज परिवर्तनाचे माध्यम म्हणून डॉ.आंबेडकर महाविद्यालयाने कार्य करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित शिक्षण व शिक्षणाचा दर्जा मिळवत डॉ.आंबेडकर महाविद्यालयाने वंचित समाजाला शिक्षणाचे दार उघडे करून दिली व त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविले. गेल्या ६० वर्षांची गौरवशाली परंपरा असणारे हे महाविद्यालय गुणवत्तेचा प्रवास विस्तारून नवनवीन शिखर गाठेल, असा विश्वास व्यक्त करत समाज परिवर्तनाचे माध्यम म्हणून या महाविद्यालयाने कार्य करावे, अशा अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केल्या.

दीक्षाभूमी स्मारक समिती संचालीत डॉ.आंबेडकर महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवी सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित हो-ते तर दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई अध्यक्षस्थानी होते. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती चंद्रशेखर,दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य डॉ. कमलताई गवई , सुधीर फ ुलझेले,राजेंद्र गवई, प्रदीप आगलावे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समतेचे राज्य, संधिची समानता आणि प्रत्येकाला स्वप्न बघण्याचा अधिकार व ते प्रत्यक्षात उतरविण्यासाठीची व्यवस्था निर्माण करण्याच्या विचारांचा वारसा पुढे घेवून जाणे आणि बाबासाहेबांचे धम्म परिवर्तनाचे महान कार्य याच मातीत घडले आहे, असे दुहेरी आ-वाहन डॉ.आंबेडकर महाविद्यालयाने यशस्वीपणे पेलत वंचितांना शिक्षणाची दार उघडी करून त्यांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडविले. बाबासाहेबांना अपेक्षित शिक्षण व शिक्षणाचा दर्जा या महाविद्यालयाने मिळविला आहे. पद्मश्री दादासाहेब गायकवाड, माजी राज्यपाल दादासाहेब गवई, सदानंद फुलझेले आदींच्या अथक प्रयत्नाने केवळ ५ वर्ग खोल्या, ५ शिक्षक आणि ३०० विद्यार्थी संख्येपासून




सुरु झालेला या महाविद्यालयाचा प्रवास हिरक महोत्सवी वर्षात ६ हजार विद्यार्थी संख्या ५० वर्ग खोल्या आणि ४० प्राध्यापक अशा गौरवपूर्ण स्थितीत येवून पोहच-ला आहे. महाविद्यालयाने विविध शैक्षणिक मानकांमध्ये सरस कामगिरी केली असून या महाविद्यालयाच्या विविध विद्या शाखांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चुरस असते असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारा-चा अंगीकार करत ध्येय गाठावे - सरन्यायाधिश भूषण गवई

स्वत:चा विकास साधताना समाजातील मागास घटकांना पुढे घेवून जाण्याचे महान विचार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांनी दिले असून या विचारांचा अंगिकार करत विद्यार्थ्यांनी आपले ध्येय गाठावे, असे प्रतिपादन सरन्यायाधिश न्यायम ूर्ती भूषण गवई यांनी यावेळी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या उभारणीत व विकासाठी दादासाहेब गायकवाड,दादासाहेब गवई, दाद-ासाहेब कुंभारे,सदानंद फुलझेले यांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगून या महाविद्यालयाच्या वाटचालीच्या विविध आठवणींना त्यांनी यावेळी उजाळा दिला. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारांचा अंगिकार व त्यातून मार्गक्रमण करणे हीच डॉ. आंबेडकर महाविद्यालयासाठी आयुष्य वेचणाऱ्या व्यक्तींना आदरांजली ठरेल असेही त्यांनी सांगितले. १९८१ मध्ये धम्मपरिवर्तनाच्या रोप्य महोत्सवी वर्षी मुंबईहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थी नागपुरात आल्या तेव्हा येथील जनतेने उत्स्फुर्तपणे त्याचे स्वागत केले ही या शहराची सर्वधर्म समभावाची ओळख असल्याचा उल्लेखही त्यांनी केला. रोप्य महोत्सवी धम्म परिवर्तन सोहळयासाठी कवी सुरेश भट यांनी रचलेल्या भिम वंदनेचे वाचन करून त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते सरन्यायाधिश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते गौरविण्यात आले. डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. दीपा पाणेकर यांचे प्रास्ताविक केले व आभार मानले तर प्राध्यापक डॉ. विद्या चोरपगार सूत्रसंचलन केले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज





## विविध मागण्यांसाठी अंबरनाथ उपमुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अंबरनाथ : अंबरनाथ नगरपरिषदेत लाड पागे समितीचा शिफारशीनुसार बाल्मिकी, भंगी, मेहतर तसेच पोटजाती सफाई कर्मचारी यांच्या वारसांना वारसाहक्काने नियुक्ती देण्यास टाळाटाळ व दिरंगाई होत असून या अन्यायाविरुद्ध मूकनायक कामगार संघटनेच्या वतीने अंबरनाथ नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी उमेश राऊत सा यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद काळे, चिटणीस राहुल पगारे, सातपूर अध्यक्ष रोहित निकम, जगदिश सोलंकी उपस्थित होते.

# महसुल सप्ताहात अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप कार्यक्रम संपन्न : तहसीलदार सचिन लंगुटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शासकीय जागेवर सन २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबापैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रममित जागांचे पट्टे वाटप दिनांक २ ऑगस्ट रोजी कार्यक्रम घेण्यात आला. यात अतीक्रमण असलेल्या कुंटुबाची यादी करुन, पात्र लार्भाथ्याचे अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रासह छानणी करुन, शक्ती प्रदत्त करुन छानणी करण्यात आली. हे कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांचेकडे सादर करणेच्या सुचना देण्यात आल्या. तसेच सन २०११ पुर्वीपासून अतीक्रमीत जागेवर रहात असलेबाबतचा पुराव्यासह लोकांनी अर्ज पंचायत समीतीकडे सादर करावेत, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.



दिनांक १ ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यात महसुल सप्ताह सुरु आहे. शनिवार दिनांक ०२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबापैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रममित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम तहसिल कार्यालय पंढरपूर येथे घेण्यात आलेला आहे. या कार्यक्रमावेळी तहसिलदार पंढरपूर सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी पंचायत समीती पंढरपूर, सर्व गांवाचे ग्रामसेवक, सर्व ग्राम महसुल अधिकारी, सर्व मंडळ अधिकारी तसेच सन २०११ पुर्वीपासुन अतीक्रमण जागेवर रहात असलेले गांवातील गावकरी सदर कार्यक्रमणाला उपस्थित होते.

यावेळी सन २०११ पुर्वीपासुन रहीवासी प्रयोजनार्थ अतीक्रमण असलेल्या कुंटुबाची यादी करुन, पात्र लार्भाथ्याचे यांचे अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रासह छानणी करुन, शक्ती प्रदत्त करुन छानणी करुन, मा. जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांचेकडे सादर करणेच्या सुचना देण्यात आल्या. तसेच सन २०११ पुर्वीपासुन अतीक्रमीत जागेवर रहात असलेबाबतचा पुराव्यासह अर्ज, पंचायत समीतीकडे सादर करणेबाबत लोंकाना आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

## नळदुर्ग बसस्थानक येथे अगाऊ आरक्षणाची सोय व चोवीस तास वहातुक नियत्रकाची सेवा उपलब्ध करावी : रिपाइं (आठवले) सह प्रवाशांची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/एस.के.गायकवाड : धाराशिव जिल्ह्यातील परिवहन महामंडळच्या तुळजापूर आगार अंतर्गत येणाऱ्या नळदुर्ग बसस्थानक येथे अगाऊ आरक्षणाची व २४ तास वाहतूक नियंत्रक सेवा उपलब्ध करावी असी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड यानी संबधित अगार प्रमुख राम शिंदे याना लेखी निवेदना द्वारे केली आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे तुळजापूर अगार प्रमुख रामचंद्र शिंदे याना रिपाइं (आठवले) च्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले की तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग हे मुंबई ते हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर वसलेले ऐतिहासिक शहर असून जवळपास ६५ गावांच्या केंद्र स्थानी आहे.देशभरात कोठेही जायचे असेलतर नळदुर्ग बस स्थानकावरचं यावे लागते. त्यामुळे या बस स्थानकावर प्रवासांची नेहमी वर्दळ असते. रात्रीच्याही वेळी या बसस्थानकावरून लांबपल्याच्या.पंधरा ते वीस बसेस ये जा करतात.त्यामुळे या ठिकाणी चौवीस तास वाहातुक नियंत्रकाची गरज आहे.तसेच या ठिकाणी अगाऊ आरक्षणाची सोय नसल्याने प्रवासाना अगाऊ आरक्षणासाठी उमरगा किंवा तुळजापूरलाचं जावे लागते त्यामुळे सामान्य प्रवाशाना नाहक अर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.तरी या बस स्थानकावर अगाऊ अरक्षणाची सोय करावी असी मागणी करण्यात येत आहे.

राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे तुळजापूर आगार प्रमुख राम शिंदे हे नुकतच नळदुर्ग बसस्थानकात काही प्रशासकीय कामा नित्ताने आले असता वरिल मागणीचे निवेदन देण्यात आले असता त्यानी या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्या कडे योग्य तो पाठपुरावा करण्यात येईल असे सांगीतले.

यावेळी रिपाइं (आठवले) नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे, पत्रकार ईरफान काझी, सामाजिक कार्यकर्ते धर्मराज देडे आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री साहाय्यता निधी – गरजूंचा जीवनदायक आधार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका: जिल्ह्यातील गरीब, गरजू रुग्णांसाठी आशेचा किरण ठरलेली योजना म्हणजे मुख्यमंत्री साहाय्यता निधी. दुर्धर व महागड्या आजारांवर उपचाराची आशा या योजनेमुळे बळकट झाली आहे. समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ही मदत प्राणवायू ठरत आहे.

> **या योजनेच्या माध्यमातून आर्थिक अडचणीत असलेल्या रुग्णांना दिलासा मिळतो आहे. बोन मॅरो ट्रान्सप्लांटसारख्या उपचारांमुळे लहान मुलांना नवीन जीवन मिळाले आहे. वेळेवर उपचार झाल्याने कर्करोग, हृदयरोग यावर मात करणारे अनेक रुग्ण आज सुदृढ जीवन जगत आहेत. मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्ष हे गरजूंना उपचारासाठी मिळणारी बहुमोल आर्थिक मदत आहे.**
> **– डॉ. अविनाश खांडेकर, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा कक्ष, सोलापूर**

सोलापूरमध्ये जिल्हास्तरीय मुख्यमंत्री साहाय्यता निधी कक्ष नियोजन भवन, सात रस्ता, सोलापूर येथे कार्यरत आहे. रुग्णांना वेळेवर उपचार मिळावा, हेच या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. बोन मॅरो ट्रान्सप्लांट, कर्करोग, हृदयशस्त्रक्रिया यासारख्या उपचारासाठी लाखो रुपयांची मदत मिळते.

अर्जासाठी आवश्यक पात्रता

- अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा
- वार्षिक उत्पन्न ₹१.६० लाखांच्या आत असावे
- रुग्ण सरकारी/धर्मादाय/मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचार घेत असावा

**मदतीस पात्र आजार**

अंतस्त कर्ण रोपण, हृदय/यकृत/मूत्रपिंड/फुफ्फुस/अस्थिमज्जा प्रत्यारोपण, कर्करोग किमोथेरपी, रेडिओथेरपी, नवजात शिशुंचे आजार, मेंदूचे रोग, डायलेसिस, विद्युत अपघात आदी गंभीर आजारांचा समावेश. उपचारासाठी आजारानुसार रू. २ लाखांपर्यंतची मदत मंजूर होते.

अर्ज प्रक्रिया

रुग्णालयातून प्रस्ताव तयार होतो व जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत तो मंत्रालयात पाठवला जातो. समिती परीक्षण करून निधी मंजूर करते. प्रक्रिया पारदर्शक व रुग्णकेंद्रित आहे.

**अर्जासाठी लागणारी कागदपत्रे**

- वैद्यकीय प्रमाणपत्र व रुग्णालयाचे खर्चाचे अंदाजपत्रक
- उत्पन्न प्रमाणपत्र, आधार/रेशन कार्ड
- आजारासंबंधी निदानात्मक माहिति
- अपघातग्रस्त रुग्णांसाठी एफआयआर
- अवयव प्रत्यारोपणासाठी समन्वय समितीचा अहवाल



## पतसंस्था संचालकपदी श्री रोहित घुले यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल अतुल गायकवाड मित्र परिवार वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हा परिषद कर्मचारी सहकार पतसंस्था क्रमांक १ सोलापूरच्या रिक्त झालेल्या संचालकपदी श्री रोहित घुले यांची बिनविरोध निवड झाल्याने अतुल गायकवाड मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी होटगीचे सरपंच अतुल गायकवाड, गोगांवचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे दिनेश बनसोडे, म्हमाणे मामा, निगापा निबाळ, यासह अतुल गायकवाड मित्र परिवार आणि कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## बार्टी संस्थेत लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध कार्यक्रमाद्वारे साजरी करण्यात आली.




बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मुंबई व त्यांच्या जन्मस्थळी वाटेगाव सांगली येथे तसेच समता दूत यांच्यामार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जयंती साजरी करण्यात आली. बार्टी, मुख्यालयात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, वषाली शिंदे, शुभांगी पाटिल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण व मनोगत व्यक्त करून विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच सारसबाग, पुणे येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुणाकती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विभागप्रमुख श्रीमती वषाली शिंदे, शुभांगी पाटील, प्रकल्प व्यवस्थापक, नसरिन तांबोळी व सुमेध थोरात आदी उपस्थित होते. यावेळी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मनपा एन विभागातील नालेसफाई करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षा साधनांच्या किटवर ठेकेदाराचा डल्ला ; कारवाई करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : मुंबईत पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी साचू नये, म्हणून मुंबई महापालिकेतर्फे दरवर्षी नालेसफाई केली जाते.यासाठी पालिका कोट्यावधी रुपये खर्च देखील करते. तसेच यंदा आपल्या मुंबई महानगरपालिका एन विभागाकडून नालेसफाईचे टेंडर निघून नालेसफाई केली गेली असली तरी,ती नालेसफाई फक्त दिखाव्यापूर्ती केली गेली असल्याची दिसत आहे.त्यामुळे यंदा हवी तशी नालेसफाई झालेली दिसत नाही.मनपा एन विभागातील बऱ्याच प्रभागात ठिकठिकाणी नाल्यातील गाळ तसाच पडून आहे. त्यामुळे यंदा नालेसफाई केली गेली का यावर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे,याशिवाय नालेसफाई करणाऱ्या कामगारांची सुरक्षितता खरोखरच धोक्यात आहे. अनेक ठिकाणी नालेसफाई करताना कामगारांना कंत्राटदाराकडून कोणतीही सुरक्षा साधने पुरवली जात नव्हती त्यामुळे त्यांचे आरोग्य आणि जीव धोक्यात होते.

नालेसफाई करताना कामगारांना हातमोजे, बूट आणि इतर आवश्यक सुरक्षा उपकरणे दिली गेली नव्हती.यामुळे नाल्यातील कचरा आणि दूषित पाण्यामुळे कामगारांना त्वचेचे आणि इतर आरोग्यविषयक समस्या येऊ शकतात.तसेच मागे विक्रोळी पार्कसाईट मध्ये नालेसफाई करताना सुरक्षा साधना किटच्या अभावी एका कामगाराचा दुदैवी मृत्यू देखील झाला होता.

ही घटना ताजी असताना देखील महापालिका एन विभाग आणि संबंधित नालेसफाईच्या कंत्राटदाराने यातून कोणताही बोध घेतलेला दिसत नाही. त्यामुळे अशी दुर्दैवी घटना पुन्हा घडू नये म्हणून सदर नालेसफाईच्या कंत्राटदाराने यावेळी देखील कामगारांच्या सुरक्षेतेसाठी कोणतेही सुरक्षा साहित्य पुरवलेले दिसत नाही.



तसेच अशी दुर्दैवी घटना पुन्हा घडल्यास याची जबाबदारी संबंधित एन विभाग प्रशासन आणि नालेसफाईचा कंत्राटदार घेणार का ? तसेच मग याला जबाबदार कोण ?तसेच यावेळी महापालिकेकडून नालेसफाईसाठी नियुक्त केलेल्या कंत्राटदाराला कामगारांच्या सुरक्षतेसाठी दिलेल्या सेफ्टी किटच्या निधीवर ठेकेदाराने डल्ला मारला असून आपण या सर्वांची उच्चस्तरीय चौकशी करावी. आणि अशा बेजबाबदार कंत्राटदाराला कायमचे ब्लॅकलिस्ट करून त्यांच्यावर कठोरातील कठोर कार्यवाही करावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून केली जात आहे.

**पंढरपूर तालुक्यातील बोगस खत तयार करणारा कारखाना मोठ्या नेत्याचा असलेली चर्चा**

# पंढरपूर तालुक्यातील काशिगाव येथील विठ्ठल खत कारखान्यात तयार होते बनावट खत; पोलिसात गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरात बनावट रासायनिक खत तयार करून त्याची शेतकऱ्यांनी विक्री करणारे मोठे रॅकेट समोर आले आहे पंढरपूर जवळच्या कासेगाव येथील रासायनिक खत तयार करणारा एका कारखान्यावर कृषी विभाग आणि पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली कारवाईदरम्यान अकरा लाख बारा हजार रुपये किमतीचा सातशे पोती खताचा बनावट साठा जप्त करण्यात आला आहे



याप्रकरणी पुणे जिल्ह्यातील थेरगाव येथील सुदीप सुरेश साळुंखे व अहिल्यानगर जिल्ह्यातील हंडी निमगाव येथील योगेश बाळकृष्ण जाधव यांच्यासह पंढरपूर जवळच्या विठ्ठल खत कारखाना यांच्या विरोधात पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कासेगाव परिसरातील विठ्ठल खत कारखान्यात महालक्ष्मी फर्टीलायझर एलएलपी कंपनीने बनावट खट तयार करून ते शेतकऱ्यांना विक्री करत असले की माहिती कृषी विभागाच्या गुण नियंत्रण पथकाला लागले होते त्यानुसार गुण नियंत्रण अधिकारी व पोलिसांनी पोलिसांनी विठ्ठल खत कारखान्यावर छापा टाकला असता तेथे बनावट व बोगस खत तयार करून त्याची विक्री करत असल्याचे निदर्शनास आले कारवाई दरम्यान विविध कंपन्यांच्या नावाने तयार केलेली ७००पोती बनावट खत आढळून आले. पोलिसांनी आरोपी विरोधात रासायनिक खत आदेश १९८५ मधील खंडचे उल्लंघन केले व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ कलम २, ३, ७, चे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शासनाच्या सर्व योजनांचा लाभ सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्यासाठी महसूल प्रशासनाने काटेकोरपणे प्रयत्न करावेत : मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम

## महसूल सप्ताहाचा उत्साहात शुभारंभ, जिल्ह्यात ७ ऑगस्टपर्यंत विविध जनहित कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महसूल विभागाच्या विविध सेवा व योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचा लाभ नागरिकांना मिळावा, यासाठी १ ते ७ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

तरी महसूल विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी शासनाच्या योजना सर्वसामान्य पर्यंत पोहोचतील यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी असे आव्हान प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.




जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'महसूल सप्ताह २०२५' चा भव्य शुभारंभ आज श्री शिवछत्रपती रंगभवन येथे झाला. प्रभारी जिल्हाधिकारी श्री कुलदीप जंगम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास पोलीस आयुक्त श्री एम. राजकुमार, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी निवडणूक गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी सुमित शिंदे, उपविभागीय प्रांताधिकारी सचिन इथापे, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, अकलूज प्रांताधिकारी विजया पांगारकर, कुर्डुवाडी प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार निलेश पाटील, संजय भोसले, मदन जाधव, श्रीकांत पाटील, शिल्पा पाटील, शिल्पा ओसवाल यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जनजागृती आणि विश्वासवृद्धीसाठी विशेष मोहिम**

प्रभारी जिल्हाधिकारी श्री. जंगम यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले की, महसूल विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, शासनाच्या कामकाजाबाबत विश्वास वाढवणे आणि योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा महसूल सप्ताह साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश आहे.

**महसूल कर्मचाऱ्यांचा गौरव**

महसूल दिनानिमित्त २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५६ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याशिवाय कार्यरत कर्मचाऱ्यांच्या १०वी व १२वीच्या गुणवंत पाल्यांचा देखील गौरव करण्यात आला. श्री जंगम यांनी महसूल कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.

**पोलीस आयुक्तांचे विशेष मनोगत**

पोलीस आयुक्त श्री एम. राजकुमार यांनी महसूल कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, शासनाचे कोणतेही महत्त्वाचे काम असो, त्याची जबाबदारी सर्वप्रथम महसूल विभागावरच असते. त्यांच्या कार्यक्षम तेमुळेच प्रशासन सुरळीत चालते.

सप्ताहभर उपक्रमांची मालिका

महसूल सप्ताहात जिल्ह्यात विविध जनजागृती मोहिमा, योजनांचे लाभ वितरण, माहिती सत्रे, कार्यशाळा आणि नागरिक संवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या कार्यपद्धतीबाबत पारदर्शकता आणि जनसंपर्क वाढवण्यावर भर दिला जाणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी प्रस्तावना सादर केली, तर अमित माळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

## शिवाजी सावंत यांच्या समर्थनार्थ पंढरपुरात शिवसेना पदाधिकाऱ्यांची राजीनामे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शिंदे शिवसेना गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. यानंतर सोलापूर मधील अकरा पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले. हेच लोन आता पंढरपूर मध्ये पोहोचले आहे प्राध्यापक शिवाजी सावंत यांच्या समर्थनार्थ शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संघटक संजय बनपट्टे आणि जिल्हा उपप्रमुख महावीर देशमुख यांनी आपल्या समर्थकांसह पक्षाचा राजीनामा दिला आहे.

प्राध्यापक शिवाजी सावंत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर जिल्ह्यामध्ये व्यवस्थित काम सुरू आहे. मात्र काही चुकीच्या लोकांनी चुकीची माहिती पक्षातील वरिष्ठांना देत आहेत. तसेच प्राध्यापक शिवाजी सावंत यांना विश्वासात न घेता निर्णय घेतले जात आहे पक्षातील गटबाजीचा आम्हाला देखील त्रास होत असल्याने आम्ही राजीनामा देत असल्याचे राजीनामा देत असल्याचे नमूद केले आहे.

संजय बदपट्टे आणि महावीर देशमुख यांच्यासह शेकडो पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिल्याने शिवसेना शिंदे गटाला हा मोठा धक्का मानला जात आहे. सदरचे राजीनामापत्र थेट उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे यांना पाठविण्यात आले आहेत.

---

## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी :सार्वजनिक उत्सवातून सामाजिक एकात्मतेची जाणीव करून देणारे थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व प्रभावी लेखणीतून व अनमोल वाणीतून वंचितांच्या व्यथा मांडणारे थोर साहित्यिक व समाज प्रबोधनकार अण्णाभाऊ भाऊ साठे यांची जयंती आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे साजरी करण्यात आली.प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे व पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते या दोनही महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले. यानंतर प्रशालेच्या कु. सोनाली तळवार, शुभांगी बाळशंकर, वैदेही पवार, मानसी तळवार व शिवानी बाळशंकर या विद्यार्थिनींची भाषणे झाली.यावेळी या दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावरती प्रशालेचे जेष्ठ शिक्षक श्री. शहाजी माने यांनी प्रकाश टाकला.या अभिवादन कार्यक्रमास प्रशालेचे जेष्ठ शिक्षक सरदार मत्तेखाने, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख अप्पासाहेब काळे,धनंजय जोजन, अब्दुल अझीझ मुल्ला,प्रा.काशीनाथ पाटील, शिक्षिका मृदुलादेवी स्वामी, सेवक विश्वनाथ सैदे व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम यांनी केले तर आभार सौ. मल्लमा चपळगाव मॅडम यांनी मानले.प्रशालेतील या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, उपसरपंच व युवा नेते श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी समाधान व्यक्त केले.

---



## ग्रामपंचायत गोगांव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सलगर/प्रतिनिधी : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ वी जयंती निमित्त ग्रामपंचायत गोगांवच्या वतीने फोटो पुजन सरपंच वनिता सुरवसे यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आला, यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, सूर्यकांत जिरगे, सुरेश सोनकांबळे यासह मान्यवर उपस्थित होते.

---

# अक्कलकोट संपूर्णतः अभिमान सन्मान सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : भारत सरकारच्या निती आयोगाद्वारे राबविण्यात येत असलेल्या आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रम अंतर्गत जुलै ते सप्टेंबर २०२४ दरम्यान राबविण्यात आलेल्या संपूर्णता अभियानामध्ये निर्देशांकाच्या अंमलबाजावणीत १००% संपृक्तता प्राप्त करणाऱ्या विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने दि. ०१ ऑगस्ट २०२५ रोजी प्रियदर्शनी मंगल कार्यालय येथे करण्यात आले.







कार्यक्रमचे अध्यक्ष माननीय आमदार श्री सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले . आकांक्षीत तालुका ऑनलाइन जी माहिती भरायचे ते जी माहिती आपण वेळेवर भरले नसल्यामुळे आपण इंडिकेटर मध्ये मागे असल्यामुळे यापुढे ऑनलाईन माहिती वेळेत व बिनचूक भरणेबाबत सर्वांना सांगितले . तालुक्यासाठी मी मोठ्या प्रमणात निधी आणत असताना सर्व अधिकारी यांनी कर्तव्याचे पालन करून जास्तीत जास्त योगदान द्यावे .आकांक्षित तालुक्याचे काम काज यशस्वीरित्या केल्यास सामान्य जनतेचे जीवनमान सुखकर होईल त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा . राज्य शासन कडून ५ कोटी निधी या कार्यक्रम अंतर्गत मिळाला आहे या कामात सर्वांनी एकत्रित येऊन आकांक्षीतमधून विकसित तालुक्याकडे आपल्याला वाटचाल करायचे आहे असे मत त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

संपूर्णतः अभियानात अक्कलकोट तालुक्याने ६ पैकी १ निर्देशांकांमध्ये संपृक्तता प्राप्त केल्याने सर्व संबंधितांना सन्मानित करण्यात आले .मा. गटविकास अधिकारी श्री शंकर कवितके यांनी स्वागत व प्रास्ताविक केले

त्यावेळी माननीय उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री सूर्यकांत भुजबळ साहेब यांनी सर्व इंडिकेटर मध्ये केंद्रात आपण आघाडीवर असावे असे मत व्यक्त केले. त्यासाठी वेळच्या वेळी कामकाज पूर्ण करून आपल्याला सर्व निर्देशांकात प्रगती दाखवावी लागेल असे मत व्यक्त केले .तसेच जिल्हा नियोजन अधिकारी श्री दिलीप पवार पवार आपणास कुठल्याही निधी कमी पडू देणार नाही आपण काम चांगले व्यवस्थित रीतीने करत आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी आकांक्षित तालुका कार्यक्रम अंतर्गत असलेल्या निर्देशांकाचे तालुक्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पंचायत समिती कर्मचारी ग्रामपंचायत अधिकारी तालुका आरोग्य अधिकारी, एएनएम, आशा सेविका, तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, बाल विकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी सेविका यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर तालुक्यातील बचत गटाच्या उत्पन्नाचे जाहिरात करण्याच्या दृष्टीने व त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने आकांक्षा हट अंतर्गत लावण्यात आलेल्या स्टॉलचे उद्घाटन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या सन्मान सोहळ्यात अक्कलकोट तालुक्याचे आमदार श्री सचिन दादा कल्याणशेट्टी साहेब ,उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) श्री सूर्यकांत भुजबळ ,जिल्हा नियोजन अधिकारी श्री दिलीप पवार साहेब ,उपनियोजन अधिकारी श्री श्रीकांत कुंटला, श्री अश्विन करजखेडे तालुका आरोग्य अधिकारी ,श्री प्रशांत अरबळे गटशिक्षणाधिकारी, श्री विशाल भोसले बाल विकास प्रकल्प अधिकारी, श्री.विद्याधर राठोड उप अभियंता पाणीपुरवठा अधिकारी, श्री हर्षद निगडे तालुका कृषी अधिकार श्री उंबरजे उप अभियंता लघु पाटबंधारे , श्री विनायक तवटे कृषि अधिकारी, यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सहाय्यक गट विकास अधिकारी अमर दोडमनी, प्रशासन अधिकारी श्री दयानंद परिचारक , ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष अभय नेलुरे व सहकारी यांनी नियोजना त सहकार्य केले. प्रास्ताविक विस्तार अधिकारी संजय पाटील यांनी केले.

---

### विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या संकल्पनेतून उपक्रमास सुरुवात

# निफाडमध्ये महसूल सप्ताहानिमित्त ३३ महसूल दूतांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राज्य शासनाच्या आदेशानुसार महसूल सप्ताह - २०२५ अंतर्गत निफाड तालुक्यात ३३ युवक-युवतींची महसूल दूत म्हणून निवड करण्यात आली. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या उपक्रमाला युवा प्रतिसाद लाभला असून, तहसील कार्यालयात महसूल दूतांचे स्वागत करून त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.




**महसूल दूत उपक्रमामुळे महसूल विभागाच्या सेवा व विविध शासकीय योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवून लोकसहभाग वाढविण्यास मदत होणार आहे. निफाड तालुक्यात ३३ जणांची महसूलदूत म्हणून करण्यात आली आहे.**

**- विशाल नाईकवाडे**
**तहसीलदार निफाड**

महसूल दूत या माध्यमातून महसूल विभागाच्या विविध सेवा, योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. निवड झालेल्या दूतांना डिजिटल क्रॉप सर्वे, ई-फेरफार, ऑनलाईन दाखले, शिष्यवृत्ती योजना, नोकरीसाठी लागणारी कागदपत्रे अशा विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.महसूल दूत हे केवळ माहिती देणारे प्रतिनिधी नसून, प्रशासन आणि समाज यामधील सेतू ठरणार आहेत. हा उपक्रम इतर तालुक्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

**या उपक्रमामुळे शासकीय प्रक्रिया समजल्या,आणि नागरिकांना मदत करण्याची प्रेरणा मिळाली.भविष्यातील शासकीय सेवेसाठी हा अनुभव मोलाचा ठरेल.**

**- ओंकार शिंदे लासलगाव**

**महसूल दूत ही संकल्पना केवळ माहिती पोहोचवण्यासाठी नसून, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाण आणि कार्यक्षमतेचा विकास व्हावा यासाठी राबवली जात आहे. महसूल विभाग आणि तरुणाई यांच्यातील ही नवी बांधिलकी आहे.**

**- डॉ शशिकांत मंगरुळे**
**उपविभागीय अधिकारी निफाड**

**महसूल विभागाशी थेट जोडले जाण्याची ही अनोखी संधी आहे. आम्हाला मिळालेलं प्रशिक्षण अत्यंत उपयोगी असून, आम्ही गावपातळीवर हे ज्ञान पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहोत.**

**- कु.गौरी कुमावत**
**चांदोरी**

---



## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ वी जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सलगर/प्रतिनिधी : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ वी जयंती निमित्त सलगर भिमनगर समाजाच्या वतीने फोटो पुजन व खाऊ वाटप करून अभिवादन करण्यात आला,

यावेळी रिपाई ता सरचिटणीस राजु भगळे, ग्रा पं सदस्य तम्मा धसाडे, ग्रा पं सदस्य परशुराम भगळे, ग्रा पं कर्मचारी जयभिम आरेनकेरी, अनिल धसाडे, सुनिल पुटगे, सागर धसाडे, आकाश साखरे,बाबू बनसोडे,बसवराज पुटगे, महादेव धसाडे, अजिंक्या मैंदर्गी, अक्षय पुटगे, शिवकुमार हळहल्ली, अनिल धसाडे, सुनिल साखरे, अजय इसामंत्री, शिवानंद आरेनकेरी, विशाल भगळे, अमित इसामंत्री, ओमकर भगळे, सचिन मैंदर्गी, रती पुटगे, ओमकर धसाडे, विलास ढोल्ले, करण भगळे, अभिजित मैंदर्गी, सुमित धसाडे. व आदी समाज बांधव उपस्थित होते.

# पंढरीत आ.अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जल्लोष

## ५२ जेसीबीतून उधळला फुलांचा वर्षाव; शुभेच्छा देण्यासाठी जिल्हयातील अनेक कार्यकर्त्यांसह नेते मंडळींनीची उपस्थीती






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माढा मतदारसंघाचे आ. अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर येथील जनसंपर्क कार्यालय येथे वाढदिवस मोठा जल्लोष संपन्न झाला.

विठ्ठल प्रतिष्ठानच्या वतीने ५२जेसीबीतून फुलांची उधळण करत क्रेनचा मोठा हार आ. पाटील यांना कार्यकर्त्यांच्या वतीने घालून वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी आशीर्वाद देण्यासाठी आलेले ह.भ.प.ज्ञानेश्वर जळगावकर महाराज म्हणाले की; अभिजीत पाटील याचे सर्वच क्षेत्रात मोठं कार्य उभा आहे. ज्यांनी विठ्ठलाच्या मूर्तीचे संरक्षण केलं त्यांचा आशीर्वाद आमदार पाटील यांच्या कुटुंबाला मिळा-लेला आहे. अगदी कमी वेळात जिल्हा नव्हे तर महाराष्ट्रात स्वतः ची स्वकर्तुत्वावर ओळख निर्माण करणारे आ.अभिजीत पाटील आहेत. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न अधिवेशनात मांडून आमदार अभिजीत पाटील हे लोकप्रिय बनलेले आहेत. त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

वाढदिवसानिमित आयोजित सत्काराला उत्तर देताना आ. पाटील म्हणाले की; मागील वाढदिवसाचे वेळी काही जणांनी आमच्यावर टीका टीपणी केली .स्वतः जेसीबी आणायचा स्वतःच फुल उधळून घ्यायची .परंतु तुम्ह-ाला माणसं कुठून येणार? हा प्रश्न तुमच्यासमोर आहे. मात्र मी माझ्या जिवाभावाची माणसं जोडलेली आहेत. त्यांच्याच जोरावर म तदाररूपी आर्शीवाद देऊन ,आज विधानसभेमध्ये निवडून आल-ो आहे.त्यामूळे तुम्ही सर्वांनी मला निवडून दिले असताना, विधानभवनात पहिल्यांदा जात असताना, विधानसभेच्या पहिल्या पायरीवर डोकं ठेवून, मंदिराप्रमाणे प्रवेश केला. तीन अधिवेशनामध्ये पहिल्या अधिवेशनामध्ये पंचावन्न, दुसर्या अधिवेशनात साठ तर पा-वसाळी अधिवेशनात एकशे सतरा प्रश्न विचारले असून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न विधानभवनामध्ये मांडले. त्या जोरावर तालिकाध्यक्ष पदावर देखील कामकाज पाहण्याची संधी मिळाली.

मागील वाढदिवसाला चार महिन्यात आमदार होत-ो म्हणून सांगितलं परंतु आमदार झालेल्यांना एका वक्तव्यामुळे दीड वर्ष विधानभवनाच्या बाहेर बसावं लागलं. म्हणून वक्तव्य जबाबदारीने करावे लागते. अशी खोचक टीकाही आ. पाटील यांनी केली..

यावेळी प्रस्ताविक प्रा.तुकाराम मस्के सर यांनी केले. यावेळी विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सदस्य संभाजीराजे शिंदे, अनिल सावंत, माजी जिल्हाधिकारी गोकुळ मवारे, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, राहुल शहा, डॉ.बी.पी रोंगे सर, विठ्ठल कारखान्याच्या व्हाईस चेअरमन प्रेमलाताई रोंगे, बालाजी मलपे, अरूण कोळी, सतीश शिंदे, किरण घाडगे, धनंजय कोताळकर, प्रशांत शिंदे, श्रीनिवास बोरगावकर, राहुल साबळे, राजन थोरात, म हादेव धोत्रे, आदित्य फत्तेपुरकर, देवानंद गुंड पाटील, सुधीर भोसले, दिगंबर सुडके, सतीश चव्हाण, प्रथमेश पाटील, अमर सुर्यवंशी, मदनसिंह पाटील, युवती अध्यक्ष चारुशीला कुलकर्णी, अनिता पवार, सावली बंगाळे यासह विठ्ठल कारखान्याचे संचालक मंडळ, पक्षाचे पदाधिकारी, आजी माजी नगरसेवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात...

### कर्मयोगी इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांची बृहन्मुंबई महापालिकेत निवड

पंढरपूरप्रतिनिधी : कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे येथील स्थापत्य शाखेतील माजी विद्यार्थी पारप्पा तुकाराम गुटकडे या विद्यार्थ्यांची बृहन्मुंबई महापालिका येथे दुय्यम अभियंता स्थापत्य पदावर निवड झाली हे अशी महाविद्यालयाची प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांनी दिली.

रायप्पा गुटकुळे हे मूळचेहुलजंती गावचे असून त्यांचे अभिनेत्री की शिक्षण शेळ-वे येथे कर्मवीर इन्स्टिट्यूट मध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग विभागामध्ये पूर्ण झाले. त्यांना मिळालेल्या यशाबद्दल महाविद्यालयांमध्ये त्यांचा नुकताच गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना रायबा गुटकुडे म्हणा-ले की, अभियांत्रिकी शिक्षण घेण्याआधी सरकारी नोकरीमध्ये जायचे असे काही ठरवलेले नव्हते परंतु कर्मयोगी इन्स्टिट्यूट म ध्ये शिक्षण घेत असताना शिक्षकांनी खाजगी नोकरी बरोबर सरकारी नोकरीचे असताना मध्ये असणाऱ्या सर्वांची वेळोवेळी माहिती करून दिली. व अधिकारी होण्याची जिद्द म नामध्ये निर्माण झाली. येथील प्राध्यापकांचे नेटके मार्गदर्शन मिळू शकते त्यामुळे यश मिळू शकले असे त्यांनी सांगितले.

रायप्पागुटकुडे यांचा सत्कार करताना महाविद्यालय प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील म्हणाले की रायपायचे यश जिद्द चिकाटी सातत्य हे त्यांना त्यांची पाठबळ होते. त्यांना मिळालेले यश हे कर्मयोगी महाविद्यालयातील एक अभिमानास्पद हेच आहे. कर्मवीर इन्स्टिट्यूट मध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जाते. तसेच नोकरीसाठी लागणारे सेट ही परी-क्षेची ही तयारी करून घेतली जाते. तसेच विद्यार्थ्यांसाठी करिअर कट्टा ही व्यासपीठ उपस्थित करून दिले जाते. त्यामुळे स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवण्याचे प्रमाण विद्यार्थ्यांची वाढत आहे. त्यांनी आवर्जून सांगितले आहे.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटिकल म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे, रजिस्टर श्री जी डी वाळके, उपप्राचार्य श्री जे एल मुडेगावकर, शैक्षणिक अधिष्ठाता श्री राहुल पांचाळ, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट प्रमुख प्राध्यापक मोहसीन शेख, विभाग प्रमुख प्राध्यापक अनिल बाबर, डॉक्टर एस एस लंबे, डॉक्टर एस व्ही एकाला कर, दीपक भोसले, प्रा अभिनंदन देशमाने तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षक कर्मचारी यांनी रायबा मुटकुडे यांची निवड झाली अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# फसवणूकप्रकरणी चौकशी समिती गठित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : दर्शनरांगेतील बॅरिकेटिंग कामाच्या ई निविदेबाबत श्री पुरुषोत्तम सग्गम, सोलापूर यांची आर्थिक फसवणूक प्रकरणी खुलासा व चौकशी करण्यासाठी मंदिर समितीच्या दि.२३/०७/२०२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र. ०१(१) अन्वये मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

या समितीमध्ये शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांचा सदस्य पदावर समावेश करण्यात आला होता. या समितीने सदर प्रकरणाबाबत खुलासा व चौकशी करण्यासाठी दि.०१ ऑगस्ट रोजी संबंधितांचे जाब-जबाब घेतले असून, लवकरच लेखी अहवाल मंदिर समितीच्या आगामी मुख्य सभेत सादर करण्यात येणार आहे. यावेळी चौकशी समितीचे सदस्य, प्रभारी व्यवस्थापक तथा लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख दादा नलवडे उप-स्थित होते.

सदर प्रकरणांशी संबंधित व्यक्तींचा लेखी जबाब नोंदविण्यात आला आहे व सविस्तर चौकशी करण्यात आली. तथापि, श्री सग्गम यांनी विधीज्ञमार्फत लेखी अर्ज देऊन एक दिवसाची मुदत मागणी केली आहे. त्यानुसार त्यांना मुदतवाढ देऊन, त्यांचा उद्या जबाब नोंदविण्यात येणार आहे. तदनंतर लेखी अहवाल तयार करून मुख्य सभेत सादर करण्यात येणार असल्याची माहिती चौकशी समितीच्या अध्यक्षा ॲड. माधवी निगडे यांनी दिली.



# तळणी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव :

औसा तालुक्यातील तळणी येथे गेल्या २६ वर्षापासुन अखंड हरिनाम सप्ताह ह.भ.प शिवराम बुवा दिंडेगावकर व ह.भ.प मारुती महाराज कानेगावकर यांच्या कृपाआशिर्वादाने सप्ताह साजरा केला जातो.

अखंड हरिनाम सप्ताहात तळणी गावात सुख समृद्धी लाभावे यासाठी व गावतील शेतकरी सुजलाम सफलाम व्हावा मनुन गावात सप्ताहात नामांकीत किर्तन कारांच्या सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात येते.

तळणी येथील विठ्ठल रुक्मिनी मंदिरात गेल्या २६ वर्षापासुन पारंपारीक अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो.

यावेळी व्यासपिठ अधिकारी ह.भ.प पिराजी हांडे सिरसलकर महाराज यांनी ज्ञानेश्वरी पारायण सेवा दीली व सप्ताहात काकडा. ज्ञानेश्वर ग्रंथ पारायण, गाथाभजन, हरिजागर, प्रवचन हरिपाठा सह सश्राव्य किर्तनाचे भाविकासाठी आयोजन करण्यात आल आहे.

यावेळी नरसिंग लंजारे, नामदेव भुजबळ, संतोष भुजबळ, संतोश सावळसुरे, बालाजी सावळस-ुरे, रमेश गिरी, तानाजी मुगळे, पंडीतराव गिरी, नेताजीराव पाटील, मोहन महाराज डांगे, गजेंद्र महाराज, बळीराम लंजारे, विनेकरी

**तळणी येथे गेल्या २६ वर्षापासुन विठ्ठल रुक्मिनी मंदिरात साजरा केला जातो अखंड हरिनाम सप्ताह**

सुधाकर मोरे, जिवन बसुळे, सुमन भोसलै, गोदाबाई मस्के, अनिता लंजारे, सुनिता लंजारे, उषा घाडगे, विजयकुमार घाडगे, सुनिता गिरी, रुषीकेश सावळसुरे, लहु यादव ,सह तळणी गावातील ग्रामस्थ व भजनी मंडळ उपस्थीत होते.

# दि.३ ऑगस्टला मनोज जरांगेपाटील यांचा खेडलेझुंगे येथे महाएल्गार मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : मराठा समाजाच्या हक्कांसाठी लढा देणारे संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत येत्या दि. ३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता खेडलेझुंगे (ता. निफाड) येथे भव्य महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर १ ऑगस्ट रोजी खेडलेझुंगे येथील योगीराज तुकाराम बाबा स्मारक मंदिरात सम ाजबांधवांची नियोजन बैठक उत्साहात पार पडली.

या बैठकीस निफाड, येवला आणि सिन्नर तालुक्यांतील शेकडो मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून समाजाच्या एकजुटीचा निर्धार केला. बैठकीत महामेळाव्याच्या तयारीचा आढावा घेण्यात आला असून, वाहतूक, पार्किंग, पाणीपुरवठा, आरोग्य व सुरक्षा व्यवस्था यांचे काटेकोर नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महामेळाव्यास ५० हजारांहून अधिक नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे तालुकास्तरावर जनजागृती मोहीम राबवून अधिकाधिक बांधवांना कार्यक्रमात सहभागी करून घेण्याचा निर्णय यावेळी एकमताने घेण्यात आला. बैठकीत प्रवीण कदम यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी प्रसाद फापाळे, अभिजित डुकरे, राजेश भडांगे, राहुल वाघ, धर्मराज घोटेकर, विजय गिते, गणेश गोरडे, अजय सदाफळ, अजिंक्य साबळे, अमोल मेमाणे, कल्पेश वायकर, भैय्या घोटेकर, अनिकेत साबळे, सागर भारस्कर, नारायण सदाफळ, ऋषी घोटेकर, अनिल सदाफळ, बाबा गोसावी, प्रदीप परदेशी, निलेश घोटेकर, सागर सदाफळ, शरद गिते, सुनील माळी, विठ्ठल बेर्डे, विष्णू मेमाणे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी संयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

# लोकप्रिय आमदार अभिजीत पाटील यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार, उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने माढा विधानसभा मतदारसंघाचे विकास

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार उद्योग व व्यापारी भागाचे प्रदेशाध्यक्ष: नागेश फाटे यांनी दिल्या शुभेच्छा**

प्रिय आमदार अभिजीत आबा पाटील यांचा श्री नागेश फाटे यांच्या हस्ते वाढदिवसानिमित्त त्यांचा यथोचित सन्मान करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी सहकार शिरोमणी सहकारी साखर कारखान्याचे संचालक योगेश ताड, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक हनुमंत पाटील, व गादेगावचे बापू बागल, माझी जण उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक मराठी, कन्नड, शाळा वागदरी येथे शाळेतील विद्यार्थीना शैक्षणिक साहित्य वाटप

# युवा उद्योजक श्री प्रकाश मंगाणे यांचे सामाजिक कार्य आदर्श घेण्यासारखे : कमलाकर सोनकांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





अक्कलकोट/प्रतिनिधी : वागदरी गावचे सुपुत्र युवा उद्योजक श्री प्रकाश चंद्रकांत मगाणे यांच्या कडुन जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलांची शाळा व कन्नड शाळा वागदरी येथे शाळेतील विद्यार्थीना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले, गरीब मुलींना शालेय बॅग व सर्व मुलींना वही पेन पेन्सिल वाटप श्री प्रकाश मंगाणे यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोगाव गावचे उपसरपंच श्री कम लाकर सोनकांबळे यांनी भूषविले ,सर्वप्रथम क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन श्री सुनील सावंत (माजी ग्रामपंचायत सदस्य ) व श्री शिवशरणप्पा सुरवसे (अध्यक्ष नाभिक महामंडळ अक्कलकोट तालुका) यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमांची प्रस्तावना कन्नड शाळेचे मुख्याध्यापक श्री बसवराज मुनोळी यांनी केले

यावेळी बोलताना कमलाकर सोनकांबळे म्हणाले की, प्रकाश मंगाणे यांनी उद्योग क्षेत्रात काम करत करत राजकारण सोबत सामाजिक काम उल्लेखनीय आहे ज्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन एवढे प्रगती करून देखील गावाच्या मातीचे व शाळेचे नाळ जोडलेले व्यक्ती म हत्व आहेत वंचित घटकातील गरीब मुलं शिक्षण पासून वंचित राहू नये यासाठी त्याचे धडपड कौतुकास्पद आहे

कार्यक्रमास प्रमुख अतिथी ग्राम पंचायत सदस्य श्री शिवराज पोमाजी ( मंत्री ) , श्री विरभद्र मंगाणे, श्री अशोक पोमाजी, सर श्री बिराजदार सर, श्री रवी पोमाजी, श्री सिध्दु कोळी, श्री महादेव सोनकवडे ,श्री विरभद्र पुरत, टायगर ग्रुप अध्यक्ष श्री शरण माशाळे, श्री उमराणे, श्री चिनमगीरी, मराठी मुलींची शाळ-ेलतील मुख्याध्यापक सौ सोनकवडे, मॅडम सौ कलशेट्टी मॅडम, सौ कुणाले मॅडम, श्री बागवान सर, सर्व प्रमुख अतिथी यांचे शाळे तर्फे यथोचित असा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कन्नाड शाळेतील मुख्याध्यापक बसवराज मुनोळी सर, श्री शिवानंद गोगाव सर, श्री परमेश्वर मुनोळी सर, नागेंद्र बिराजदार सर, श्री शिवशंकर बिराजदार सर, श्री सिध्दाराम होद-लूरे सर, श्री प्रशांत हत्तरकी सर ,सौ. जयश्री मुनोळी मॅडम, श्री स्वामी सर, परिश्रम घेतले सुत्रसंचलन श्री शिवानंद गोगाव सर यांनी केले आभार श्री परमेश्वर मुनोळी सर यांनी मानले.